# ऋ ण नि र्दे श

आभार प्रदर्शन हा एक औपचारिक भाग असला तरी अंत:करणाची भाषा व्यक्त करण्याचे एक माध्यम म्हणून त्याचा स्वीकार करणार आहे.

"राजकीय गटबाजीची गतित्वे, कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस पक्ष - एक अभ्यास" १९७७ ते १९८८" ही शोधप्रबंधिका सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. अनेकांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्यातून प्रबंध लिहिण्याचे काम पूर्ण करु शकलो.

माझ्या शोधप्रबंधिकेच्या विषयानुरोधाने लेखन, करण्यासाठी तसेच प्रबंधाचे काम पूर्ण करण्यास ज्यांची सतत प्रेरणा व त्यालायोग्य दिशा प्राप्त करण्यासाठी माझे मार्गदर्शक डॉ. गोपाळ गुरु (राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांचे अत्यंतिक मोलाचे व उत्स्फूर्त मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्यामुळेच ही शोधप्रबंधिका लिहू शकलो. म्हणून त्यांच्या ऋणातून उतराई होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यात मला अतिशय आनंद वाटेल.

राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. के.के. कावळेकर यांच्या प्रोत्साहनामुळे तसेच डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. वासंती रासम, प्रा.डी.यु. पवार, डॉ. भालबा विभूते, प्रा.डॉ. शिरगावकर यांचे बहुमोल मार्गदर्शन या कामात मिळाले म्हणून मी त्यांचा ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठाचे बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय, शिवराज महाविद्यालया गडहिंग्लजचे ग्रंथालय तसेच दै. पुढारी, दै. सकाळ, दै. सत्यवादी, कोल्हापूर या ग्रंथालयांची खूपच मदत झाली त्यांचा मी आभारी आहे.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.व्ही. तोगले यांचे प्रोत्साहन

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

व जयंत सबनीस यांचे सहकार्यामुळे मी हा प्रबंध लिहू शकलो. तसेच दै.पुढारी ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. रामभाऊ देशपांडे यांचे मन:पूर्वक सहकार्य त्यामुळे त्यांचेही आभार मानण्याचे कर्तव्य समजतो.

माझे मित्र रामभाऊ कदम, प्रा.वसंत पाटील, प्रा.भुपाल पाटील, प्रा. निवासराव जाधव, श्री.संभाजीराव तोरस्कर, दत्ताजीराव जाधव, तानाजी देवडकर यांचेही सहकार्य अतिमहत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांचेही आभार मानतो.

कोल्हापूर जिल्हयातील कॉंग्रेस नेते डॉ. बाळासाहेब माने, आ.रत्नाप्पा कुंभार, आ.बाबूराव धारवाडे, गणपतराव कुंभार, गजाननराव पाटील, प्रकाश देसाई यांनी आपला बहुमूल्य वेळ देऊन मुलाखती दिल्या व शोध निबंध पूरा करण्यास फार महत्त्वाची माहिती दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

आज पर्यंतच्या माझ्या शैक्षणिक जीवनात ज्यांच्या महत्त्वाचा वाटा आहे ते माझे पिताश्री बळवंत गोपाळ भोळे, यांचाही मी ऋणी आहे.

प्रबंधाच्या टंकलेखनाचे काम माझे मित्र श्री. विष्णूपंत खाडे यांनी व भावेश्वरी प्रेस, राजारामपुरी यांनी बांधणी अल्पावधीत सुबक करून दिले त्यांचाही मी आभारी आहे.

या शोध निबंधाच्या तयारीच्या कामी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य व प्रेरणा लागली त्यांचाही मी ऋणी आहे.

धन्यवाद !

(सुखदेव बळवंत भोळे)

कोल्हापूर:
दि. 29.11.90

.....